# सोलापूर सिद्धेश्वर सहकारी बँक लि., सोलापूर

मुख्यकार्यालय : २०५, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर

## दंड आकारणी धोरण -2024-25

**१) प्रस्तावना :** कोणत्याही कर्जदाराचे कर्ज खाते बँकेच्या नियमाप्रमाणे आणि/अथवा कर्ज मंजुरीच्या अटी आणि शर्तीनुसार चालत नसेल उदाः खात्याचे कर्ज हप्ते नियमित न भरले जाणे, कर्ज खाते थकीत होणे, कॅश क्रेडीट ओव्हर ड्राफ्ट खात्याचे व्याज नियमित न भरले जाणे, स्टॉक स्टेटमेंट वेळेवर न दिले जाणे, खाते वेळेत नूतनीकरण करून न घेणे, मंजूर मर्यादेपेक्षा खाते वरचेवर ओव्हरड्रॉन राहणे इ. परिस्थितीत कर्ज खात्यावर दंड व्याजाची आकारणी करण्याची पद्धत बँकिंग इंडस्ट्री मध्ये पूर्वापारपासून चालत आलेली आहे. या संदर्भात भारतीय रिझर्व्ह बँकेने दि. १८ ऑगस्ट २०२३ रोजी परिपत्रक दिले असून त्यानुसार कर्ज खात्यावर दंड व्याज लावण्याबद्दल सुधारित मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. सदर परिपत्रकावर आधारून बँकांनी बोर्ड सभेच्या मंजूरीने आपले दंड आकारणी विषयीचे धोरण निश्चित करावे आणि त्यानुसार अंमलबजावणी दि. ०१ जानेवारी २०२४ पासून करण्याचे निर्देश दिले आहेत.

**२) धोरणाचा हेतू :** खालील हेतू प्राप्तीसाठी सदरचे धोरण निश्चित करण्यात येत आहे.

i. भारतीय रिझर्व्ह बँकेचे परिपत्रक संदर्भ क्र. DoR. MCS. REC.28/01.01.001/2023-24 दि. १८ ऑगस्ट २०२३ अन्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी करणे.

ii. कर्ज खातेदाराने आपले कर्जखाते सतत नियमित ठेवावे, तसेच कर्ज खात्याचे व्यवहार /ऑपरेशन्स हे बँकेच्या नियमाप्रमाणे आणि कर्ज मंजुरीच्या अटी आणि शर्तीनुसार व्हावे, या साठी कर्ज खातेदारास प्रोत्साहित करणे.

iii. दंड आकारणी करण्याच्या संदर्भात सर्वांना समान लागू होईल अशी पारदर्शी आणि नियमबद्ध कार्यप्रणाली तयार करणे.

**३) कोणत्या परिस्थितीत दंड लावला जाईल :** खालील परिस्थितीत कर्जदारास दंड लावला जाईल

a) टर्म लोन कर्जाचा मासिक हप्ता (EMI) निश्चित तारखेस बँकेस प्राप्त न झाल्यास, प्रत्येक महिन्याच्या डिफॉल्ट साठी एकूण ३ डिफॉल्ट साठीः

1. मासिक कर्जहप्ता (EMI) रकमेच्या ३% प्रमाणे होणारी रक्कम दंड म्हणून आकारणी केली जाईल.

ii. कर्ज खाते सब-स्टैंडर्ड एनपीए म्हणून वर्गीकृत झाल्यानंतर NPA झाल्याच्या तारखेपासून खात्यावरील संपूर्ण थकबाकी वसूल होऊन खाते पुन्हा स्टैंडर्ड होण्याच्या तारखेपर्यंत, येणे रकमेवर (लेजर बॅलन्स) ३% प्रमाणे होणारी रक्कम दंड म्हणून आकारणी केली जाईल.

b) कॅश क्रेडीट / ओव्हरड्राफ्ट / वेअर हाऊस रिसीट तारण कर्जासाठी मासिक व्याज खात्यावर डेबिट पडून खाते ओव्हरड्रॉन झाल्यासः

i. व्याजरकमेवर ३% प्रमाणे दंड आकारणी संपूर्ण व्याज वसूल होण्याच्या दिनांक पर्यंत केली जाईल.

ii. सलग ३ महिन्याचे व्याज वसूल न झाल्यास आणि खाते सब-स्टैंडर्ड एनपीए म्हणून वर्गीकृत झाल्यास संपूर्ण येणे रकमेवर (लेजर बॅलन्स) ३% प्रमाणे दंड आकारणी केली जाईल.

iii. खात्याची मुदत संपल्यानंतर खाते नूतनीकरण न झाल्यास खात्याची मुदत संपल्याच्या तारखेपासून खात्याचे नूतनीकरण होईपर्यन्त येणे रकमेवर ३% प्रमाणे दंड आकारणी केली जाईल. मात्र ज्या खात्यास बोर्ड मंजूरीने मुदत वाढ दिलेली असेल तर आशा खात्यावर कुपनरेट +३% प्रमाणे व्याज आकारणी केली जाईल. मात्र संचालक मंडळाने दिलेली मुदत उलटूनही खाते नूतनीकरण न झाल्यास ३ % दंड आकारणी केली जाईल.

४) **दंडाची वसूली**: दंडाची रक्कम कर्ज खात्यास डेबिट टाकली जाणार नाही. ती स्वतंत्र येणे म्हणून दाखवली जाईल. ज्या वेळी खातेदाराकडून खात्यावर भरणा येईल त्यावेळी सर्वप्रथम दंडाची रक्कम वसूल केली जाईल.

५) **दंड क्षमापित करणे**: कर्ज खात्यावर लावण्यात आलेल्या दंडाची रक्कम क्षमापित करण्याचा अधिकार मा. संचालक मंडळाचा आहे. मात्र त्यासाठी कर्जदाराने लेखी विनंती अर्ज करणे आवश्यक आहे. संचालक मंडळाने क्षमापित केलेल्या दंडाची रक्कम ही कर्जदाराकडून येणे बाकी असलेल्या मुद्दल, येणे व्याज आणि इतर यामधून वगळली जाईल. मात्र, संचालक मंडळाने दंड रक्कम क्षमापित केल्यानंतर अर्जदाराने इतर सर्व थकीत रकमेचा भरणा खात्यात करून खाते अप-ग्रेड अथवा संपूर्ण बेबाक करणे आवश्यक राहील.

सदरचे धोरण १ जानेवारी २०२४ पासून सर्व शाखेतून लागू राहील

जनरल मॅनेजर

सदर धोरणाचा आढावा दि. 29/07/2024 रोजीच्या संचालक मंडळाच्या सभेत घेण्यात येऊन सदरचे धोरण आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी लागू राहील असे ठरले.

जनरल मॅनेजर

SOLAPUR SIDDHESHWAR SAH. BANK LTD. H.O. SOLAPUR